ईमेलद्वारे

दूरध्वनी क्र. ०२२-२४९२७६३१ / २४९४३७६४
ई-मेल – dmainfo5@gmail.com
संकेतस्थळ-https://mahadma.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र शासन**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.

क्रमांक - नपप्रसं/सं.मु.आस्था/पदोन्नती/२०२०/कक्ष-२/2552 दिनांक : ११.११.२०२०

11 NOV 2020

प्रति,

सर्व प्रादेशिक उप संचालक,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय, नगरपरिषद प्रशासन.

**विषय :- :- मुख्याधिकारी, गट-अ पदावरील अधिकाऱ्यांना मुख्याधिकारी, गट-अ (नि.श्रे.) या वरीष्ठ पदावर व मुख्याधिकारी गट-ब पदावरील अधिकाऱ्यांना मुख्याधिकारी, गट-अ या वरीष्ठ पदावर पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या अनुषंगाने 19/11/2020 रोजी प्रादेशिक उप संचालक कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) नगर विकास विभाग पत्र क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१२६/नवि-१४, दि.१८.०९.२०२०.
२) नगर विकास विभाग पत्र क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१२६/नवि-१४, दि.२८.०९.२०२०.
३) संचालनालय समक्रमांकाचे पत्र जावक क्र.१९४३, दि.२८.०९.२०२०.
४) संचालनालय समक्रमांकाचे पत्र दि.०४.११.२०२० व दि.०६.११.२०२०.

**मा.महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र.१ शासन,नगर विकास विभागाकडील दि.१८.०९.२०२० च्या पत्रान्वये सन २०१९-२० ची निवडसुचीसाठी विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची यादी तयार करावयाची आहे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनूसार पदोन्नतीच्या कोट्यातील केवळी खुल्या प्रवागातील निवडसुचीसाठी संभाव्य उपलब्ध मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी) - १८, मुख्याधिकारी, गट-अ - २२ रिक्त पदे सेवाजेष्ठतेनूसार भरावयाची असल्याने, विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.२५.०९.२०२० रोजी मा.प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

०२. त्याअनुषंगाने, संदर्भाधीन पत्र क्र.३ येथील दि.२८.०९.२०२० च्या पत्रान्वये सन २०१९-२० च्या निवडसुचीनूसार पदोन्नतीसाठी विचारक्षेत्रात असलेल्या मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), मुख्याधिकारी, गट-अ व मुख्याधिकारी, गट-ब पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची सन २०१४-१५ ते सन २०१९-२० या कालावधीचे गोपनीय अहवाल, सन २०१९-२० चे मत्ता व दायित्व विवरणपत्र तसेच पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली परिपूर्ण कागदपत्रे (परिविक्षाधीन कालावधी समाप्त आदेश, हिंदी-मराठी भाषा सुट आदेश, संगणक अर्हता प्रमाणपत्र, विभागीय परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र इ.) संबंधित विभागाने संकलित माहिती सादर दि.१०.१०.२०२० पर्यंत एकत्रित सादर करण्याबाबत कळविले होते. तसेच संदर्भाधीन पत्र क्र.२ येथील दि.२८.०९.२०२० च्या शासन नगर विकास विभागाकडील पत्रान्वये देखोल सुचित करण्यात आले आहे. **(सोबत प्रत)**

०३. सन २०१९-२० च्या निवडसुचीनूसार पदोन्नतीसाठी विचारक्षेत्रात असलेल्या मुख्याधिकारी, गट-ब पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी सन २०१४-१५ ते सन २०१९-२० या कालावधीचे गोपनीय अहवाल, सन २०१९-२० चे मत्ता व दायित्व विवरणपत्र तसेच पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली परिपूर्ण कागदपत्रे संचालनालयास दि. ११.११.२०२० पर्यत प्राप्त झाल्यानूसार, संचालनालयाकडून अद्ययावत केलेली यादी सोबत जोडली आहे. अद्याप अप्राप्त असलेले गोपनीय अहवाल व पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले अन्य कागदपत्रे यादीनूसार एकत्रित संकलीत करण्यासाठी दि.१९.११.२०२० रोजी प्रत्येक प्रादेशिक उप संचालक कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करावे व दिनांक २०.११.२०२० पर्यंत विशेष दूतामार्फत आवश्यक सर्व कागदपत्रे संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय दि.०१.०८.२०१९ नूसार ज्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत व पुर्नविलोकन झालेले नसतील, परंतू त्यांनी स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल लिहून संबंधित अधिकाऱ्यांकडे प्रतिवेदीत/पुर्नविलोकन करण्यासाठी सादर केलेल्या पत्राची प्रत विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन सादर करावी ही विनंती.

**<u>मा.सह संचालक यांच्या मान्यतेने</u>**

( अभिषेक पराडकर )
सहायक संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

प्रत :- १) मा.अवर सचिव, नगर विकास विभाग (नवि-१४), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
२) सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद प्रशासन यांना उचित कार्यवाहीस्तव.